जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५०८ दिनांक - ०८/०७/२०२३**

पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये

## ऑल आऊट ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर केली प्रतिबंधक कारवाई

श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंबिंग ऑपरेशन करुन गुन्हेगारांना चेकींग करुन प्रतिबंधक कारवाई करणे, तसेच हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आढळून येणारे संशयीत इसम/घटना इत्यादी कसून तपासणी करणे बाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दिनांक ०७/०७/२०२३ रोजी २०.०० ते दिनांक ०८/०७/२०२३ रोजी ०१.०० वा. पर्यत कोंबिग ऑपरेशन व तपासणी करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**आरोपी चेकींग अभियानमध्ये एकुण १९९४ गुन्हेगारांना चेक करण्यात आले असून त्यापैकी ६९५ गुन्हेगार मिळुन आले आहेत.**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये एकुण २४ आर्म ॲक्ट गुन्ह्यांमध्ये एकुण २४ आरोपी अटक करुन त्यांचेकडुन १ पिस्टल, तसेच २३ धारदार हत्यारे असा एकुण रु. ६७,१५०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ १ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ १ मध्ये मपोका १४२ प्रमाणे २ केसेस करुन २ आरोपींना अटक केली आहे. तसेच प्रोव्हिबिशन प्रमाणे ६ केसेस करण्यात आलेल्या असुन ६ आरोपींकडुन रु. ३४३०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ६ केसेस करुन १५ आरोपींकडुन रु. १०,७९०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ २ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-२ मध्ये गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण १२ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच मोक्का मधील पाहीजे असलेला १ आरोपीस अटक केली आहे. मपोका १४२ प्रमाणे १ केस करुन १ आरोपी अटक केला आहे. तसेच प्रोव्हिबिशन प्रमाणे १२ केसेस करण्यात आलेल्या असुन १२ आरोपींकडुन रु. ८,४१०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ४ केसेस करुन ७ आरोपींकडुन रु. १५,९८०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ३ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-३ मध्ये एकुण प्रोव्हिबिशनमध्ये एकुण १५ केसेस करुन १५ आरोपीकडुन रु. १३,७४०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण २ केसेस करुन ३ आरोपींकडुन रु. १,९००/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ४ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-४ मध्ये मपोका १४२ प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपी अटक केला आहे. तसेच प्रोव्हिबिशनमध्ये एकुण १४ केसेस करुन १४ आरोपीकडुन रु.

१२,४१५/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ८ केसेस करुन २२ आरोपींकडुन रु. १५,९८५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ५ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-५ मध्ये प्रोव्हिबिशन ॲक्ट प्रमाणे एकुण १२ केसेस मध्ये १२ आरोपी यांना अटक करुन त्यांचेकडुन रु. ८,५०५/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १ केस करुन १ आरोपींकडुन रु. ७४०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे एनडीपीएस प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपीकडुन ४५० ग्रॅम गांजा रु. २,८५०/- चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

**गुन्हे शाखेने केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईमध्ये मपोका १४२ प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपीस अटक केली आहे. त्याचप्रमाणे एनडीपीएस प्रमाणे २ कारवाई करुन २ आरोपीकडुन एकुण ४१० ग्रॅम गांजा, ३ किलो ५१५ ग्रॅम बंटा, ६ किलो १६७ ग्रॅम अफीमच्या बोंड्यांचा चुरा रु. २६,०००/- व मोबाईल असा एकुण रु. १,७५,८५५/- चा मुद्येमाल जप्त केला आहे.

**ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान गुन्हे शाखेकडील अधिकारी श्री. सुनिल तांबे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा- १, श्री. श्रीहरी बहिरट, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट ३, गुन्हे शाखा, पोउपनि पवार हे म्हाडा वसाहत, वारजे माळवाडी या ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन करीत होते. रोझरी स्कुलजवळ ८ ते १० संशयित आरोपी हे दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना गुन्हे शाखेकडील पथक आणि आरोपी यांचेमध्ये झटापट झाली त्यामध्ये एक पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले त्यानंतर पोलीसांनी फायरिंग करुन ५ आरोपींना ताब्यात घेतलेले आहे इतर आरोपीची शोध मोहिम चालु आहे. नमुद आरोपी हे रेकॉर्डवरील गंभीर गुन्हेगार आहे.**

**नमुद घटनेबाबत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन या ठिकाणी गु.र.न.२८६/२०२३ क ३०७,३९९,४०२ आ.ॲ.३/२५,४/२५, मपोकाक ३७/१(१३५) अन्वये गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयात ५ आरोपींना अटक करुन त्यांचेकडुन १ गावठी कट्टा त्यामध्ये ४ जिवंत राऊंड, २ लोखंडी कोयते, कटावणी, स्क्रु ड्रायव्हर, लोखंडी हातोडा, लोखंडी पाईप, लोखंडी पकड, कटर असा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**सदर विशेष मोहिमे दरम्यान एकुण कारवाईचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

- खडक, शिवाजीनगर, विश्रामबाग, सिंहगड रोड, चतुःश्रृंगी, हडपसर व कोंढवा पोलीस स्टेशनने बेलेबल व नॉन बेलेबल वारंट बजावणी उत्कृष्ठपणे केलेली आहे.
- मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट प्रमाणे एकुण गुन्हे शाखेने १४ केसेस करुन १४ आरोपींकडुन रोख व गावठी दारु असा रु. ३९,९३०/- व पोलीस स्टेशनने ५९ केसेस करुन ५९ आरोपींकडुन रु. ४६,५००/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महा.जुगार ॲक्ट प्रमाणे पोलीस स्टेशनने २१ केसेस करुन त्यामध्ये ४८ आरोपींना अटक करुन जुगार साहित्य व रोख रु. ४५,३९५/- व गुन्हे शाखेने जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण २ केसेस करुन ७ आरोपींकडुन रु. १४,७१०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
- सीआरपीसी कायदा १५१(१) प्रमाणे १९ आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे.
- सीआरपीसी कायदा १५१(३) प्रमाणे ३ आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे.
- तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १४२ प्रमाणे गुन्हे शाखेने ५ तडीपार गुन्हेगारांवर कारवाई केलेली आहे.

➢ पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण ३४८ हॉटेल, ढाबे व लॉजेस चेक, तसेच ११८ एस टी स्टॅण्ड/ रेल्वे स्थानक/ निर्जन ठिकाणे चेक करण्यात आले आहे.

➢ वाहतुक शाखेकडुन १८२२ संशयित वाहन चालकांना चेक करुन ५६८ जणावंर वाहन धारकांवर कारवाई करुन रु. ४,६३,०५०/- दंड वसुल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांचे आदेशान्वये, मा.पोलीस सहआयुक्त, श्री. संदीप कर्णिक, पुणे शहर, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. प्रविण पाटील, मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. रंजन कुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, संदीप सिंह गिल्ल, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील,मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, सुहेल शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, श्री. शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५, श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील अधिकारी / अंमलदार तसेच वाहतुक विभागाकडील अधिकारी / अंमलदार यांचे पथकाने संयुक्तपणे उपरोक्त कामगिरी केली आहे. यापुढेही कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येवून गुन्हेगारांचे हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

**मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार व मा.पोलीस सहआयुक्त, श्री. संदीप कर्णिक, पुणे शहर यांनी स्वत ऑल आऊट ऑपरेशन (कोम्बिंग) मध्ये सहभाग घेऊन वेगवेगळया ठिकाणी भेटी देवुन पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना योग्य ते मार्गदर्शन केले.**

| अ.नं. | तपशील | एकुण कारवाया | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| १ | **आर्म्स ॲक्ट** | २४ | २४ |
| २ | **मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट** | ७३ | ७३ |
| ३ | **मपोका क १४२ प्रमाणे** | ५ | ५ |
| ४ | **जुगार ॲक्ट** | २३ | ५५ |
| ५ | **इतर विशेष कामगिरी (गुन्हे शाखा)** | १ | ५ ( वारजे पो.स्टे २८६/२०२३ मधील आरोपी सह) |
| ६ | **एनडीपीएस कारवाई** | ३ | ३ |
| **एकुण** | | १२९ | १६५ |

**(सुनिल तांबे)**
सहाय्यक पोलीस आयुक्त,
गुन्हे -१, पुणे शहर